**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय,**
**१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.**
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- dydpune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

---

जा.क.शिउसं/उमाशि-३/११ वी ऑनलाईन/२०१५/१६९७ दिनांक 15 SEP 2015

प्रति,

प्राचार्य (सर्व),
उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.

**विषय ः महाविद्यालयीन स्तरावरील इ.११ वी चे उर्वरित प्रवेश प्रकियेचे वेळापत्रकनुसार केलेल्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ ः १. जा.क.उमाशि-१/पुवि/पीआयएल/१२७/२०१५-१६ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक ०२.०९.२०१५ चा आदेश.

२. जा.क.उमाशि-१/११ वी ऑनलाईन/पुवि/२०१५ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक ०४.०९.२०१५ रोजी दिलेले वेळापत्रक.

३. जा.क.शिउसं/उमाशि-३/११ वी ऑनलाईन/२०१५ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचा दिनांक १४.०९.२०१५ चा आदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, इ ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेर्तंगत महाविदयालयीन स्तरावर रिक्त जागांवर गुणवत्तेप्रमाणे करावयाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक संदर्भ कमांक २ च्या पत्रानुसार दिनांक ०४.०९.२०१५ ते ११.०९.२०१५ रोजी पर्यंत देण्यात आले होते. त्यानुसार आपण आपल्या स्तरावरून योग्य कार्यवाही केलेली आहे. परंतु अदयापही काही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जागा रिक्त आहेत. त्या रिक्त जागांवर ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करताना प्रचलित नियमानुसार कनिष्ठ महाविदयालय स्तरावर नियोजन करून त्याप्रमाणे दिनांक २८.०९.२०१५ पर्यंत प्रवेश देऊन जागा भरून काढाव्यात व प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावी व प्रवेशाचा संपूर्ण अहवाल या कार्यालयास दिनांक २९.०९.२०१५ पर्यंत सादर करण्यात यावा.

तसेच उर्वरित रिक्त जागांवरील प्रवेशासंदर्भातील सर्व सूचना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर वेळोवेळी प्रसिध्द कराव्यात दिनांक २८.०९.२०१५ नंतर इ.११ वी चे कोणतेही प्रवेश देऊ नयेत व विद्यार्थी व पालकांना या कार्यालयाकडे पाठविण्यात येऊ नये.

MBraut 16.9.15

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
प्र.सहाय्यक शिक्षण संचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे — १